<table>
<tr>
<td>MHKO070006832022</td>
<td><u>नियमीत दिवाणी दावा क्र.१०४/२०२२ मधील</u><br><u>नि.क्र.१६ खालील आदेश</u><br>(श्रीमती सोनाबाई आनंदा निर्मळ मयत वारस आणि इतर<br>–विरुध्द–<br>राजाराम भाऊ निर्मळ मयत वारस आणि इतर)</td>
</tr>
</table>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२, ३ अ (१ ते ४) ब, क यांनी त्यांना कैफियत देणेसाठी झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी व कैफियत दाखल करून घेणेसाठी दाखल केलेला आहे. त्यांनी अर्जात असे कथन केले आहे की, अ) सदर कामी कैफियत देण्यास प्रतिवादी यांनी जाणूनबुजून विलंब केलेला नाही. ब) यातील प्रतिवादी यांचे कडून कैफियतीसाठी आवश्यक ती कागदपत्रे वेळेत उपलब्ध झालेली नाहीत. त्यामुळे सदर कामी कैफियत देण्यास विलंब झाला आहे. क) यातील प्रतिवादी नं. २ हे वयस्कर असून ते सतत आजारी असतात त्यामुळे त्यांना वकिलांना भेटून वेळेत कैफियत देता आलेली नाही. ड) सदरचा अर्ज मंजूर झालेस वादीचे कसलेही नुकसान होणार नाही याउलट हा अर्ज नामंजूर झाल्याने प्रतिवादीचे कशानेही न भरून येणारे अतोनात नुकसान होणार आहे. इ) प्रतिवादीची कैफियत रेकॉर्डवर आलेस सदर कामी गुणदोषावर निर्णय होणेस मदत होणार आहे. ई) इक्वीटीच्या न्यायतत्वानुसार सदरचा अर्ज मंजूर होणे भाग आहे. सबब प्रतिवादी क्र.२, ३ अ (१ ते ४) ब, क यांनी सदरचा अर्ज मंजूर करणेत यावा व सदर कामी प्रतिवादी सदर यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०२.** वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जास असे म्हणणे दिले आहे की, प्रतिवादी यांनी नि.१६ वरती दिलेल्या अर्जातील मजकुर साफ खोटा, चुकीचा व लबाडीचा आहे. तो प्रस्तुत वादी यांना मान्य व कबुल नाही. प्रस्तुत प्रतिवादींच्या अर्जातील कथनांच्या अनुषंगाने प्रतिवादीने कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील कथनावरती सकृत दर्शनी विश्वास ठेवता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

**०३.** वादी आणि प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेचा व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२, ३ अ (१ ते ४) ब, क यांनी

सदरचा अर्ज कैफियतीसह दाखल केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांना संधी देणे न्यायोचित वाटते. जर तसे केले नाही तर त्यांच्या बचावाचे दरवाजे बंद होतील व सदरील दावा हा गुणावगुणावर निकाली लागणार नाही व त्यांच्या कायदेशीर अधिकारावर गदा येईल, तरी न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत प्रतिवादींना बचावाची संधी देणे विधीसंगत वाटते. त्याचबरोबर प्रस्तुत प्रतिवादी यांना झालेला विंलब देखील दुर्लक्षीत करता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज हा खर्चावरती मंजूर करणे न्यायोचित होईल. सदर प्रकरणातील वस्तुस्थिती व दाव्याचे स्वरूप पाहता, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.१६) रक्कम रु.२००/– (रुपये दोनशे फक्त) च्या खर्चावरती मंजूर करण्यात येतो.

२. सदर खर्चाची रक्कम वादी यांना दिलेनंतर प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

PATIL MAYUR SAMPAT

Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2025.07.17 17:35:12 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

दि.१७/०७/२०२५

**(एम. एस. पाटील )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर.